त्वरीत

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक 4/8/87

प्रति,

शिक्षणाधिकारी
[ प्राथमिक विभाग ]
जिल्हा परिषद

विषय :- जून १९८७ पूर्वी जुन्या पध्दतीनुसार सुरु असलेल्या अनधिकृत खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस २०८७/(३२६१)प्राशि३ दि. चे पत्र २० जुलै ८७

उपरोक्त विषया संबंधीचे आपले कार्यालयास पृष्ठांकितकेलेले शासनाकडील संदर्भित पत्र कृपया अवलोकावे

याबाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्व साधारण बंदीला अपवाद करुन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविल्या ठिकाणी व माध्यमातून जून १९८७ पासून प्राथ. शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| सरस्वती शिक्षण संस्था तळेगाव दाभाडे | सरस्वती विद्या मंदिर, तळेगाव | १ली ते ३री | मराठी. |

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्ट्या सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहीत केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहीत केलेल्या नियमानुसार विहीत वयोमर्यादा व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहीत केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.